# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(पत्रपरिषद)

**दिनांक १४.१०.२०२६ बुधवार**

**गुन्हेशाखा पोलीसांची कामगिरी :— जबरी चोरी करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीतील सदस्य आरोपींना अटक.**

दिनांक ०३.१०.२०२६ चे १६.४० वा. ते १६.५५ वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत हिंगणा रोड, महाकाली बारसमोर फिर्यादी राकेश सुभाष ढोमणे, वय ३९ वर्षे, रा. प्लॉट नं. ९६, गजानन नगर, एमआयडीसी, नागपुर यांचे सोने—चांदी खरेदी—विक्रीचे ढोमणे ज्वेलर्स नावाचे दुकान आहे. त्यांचे दुकानात काम करणारा मुलगा नामे शुभम खेमराज हाडगे, वय २४ वर्षे, रा. गजानन नगर, नागपुर हा दुकानात हजर असतांना अनोळखी ०४ ईसमांनी दुकानात प्रवेश करून, शुभमला बंदुक सारख्या दिसणाऱ्या अग्नीशस्त्राचा धाक दाखवुन व जिवे मारण्याची धमकी देवुन, दुकानातील सोन्या—चांदीचे दागिणे वजनी अंदाजे ३५० ग्राम किंमती ४०,००,०००/—रू. चा मुद्देमाल जबरीने हिसकावुन, शुभम यास मारहाण करून, तेथुन पळुन गेले. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे आरोपींविरूध्द कलम ३०९(४),३(५) भा.न्या. सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

एमआयडीसी पोलीस व गुन्हेशाखा पोलीसांनी समांतर तपास सुरू करून, ३००—४०० सिसिटीव्ही फुटेजचे विश्लेषण केले. तसेच, तांत्रीक तपास व एआय तंत्रज्ञानाचा वापर करून, परीस्थीतीजन्य पुराव्यांचे आधारे आरोपी शोधकामी गुन्हेशाखा पोलीसांची ०२ पथके उत्तरप्रदेश व हरीयाणा राज्यात रवाना करण्यात आली होती. दोन्हीही पथकांनी ०४ दिवस स्थानिक क्षेत्रात स्वत:ची ओळख लपवुन, तंत्रज्ञान तथा स्थानिक पोलीसांचे मदतीने आरोपींची माहीती काढली. आवश्यकतेनुसार गुन्हेशाखेचे ३ रे पथकसुध्दा तपासकामी रवाना करण्यात आले. पोलीसांनी सतत सात दिवस आरोपींचे मागावर राहुन, आरोपी नामे १) अभिषेकसिंग ठाकुर यास बरेली, उत्तर प्रदेश येथुन ताब्यात घेतले. त्याचेकडे सखोल विचारपुस करून, त्याचे गुन्ह्यातील ईतर साथीदार क्र. २) जयराम उर्फ जोगींदर अशोकसिंग ठाकुर, वय १९ वर्षे, ३) शुभांकीत निलेशकुमार चतुर्वेदी, वय २२ वर्षे, यांना नोएडा, उत्तर प्रदेश येथुन ताब्यात घेतले. ४) राजन सामी शर्मा, वय २९ वर्षे यास मेरठ, उत्तर प्रदेश येथुन ताब्यात घेतले. त्यांचे ईतर साथीदारांचा शोध सुरू आहे.

गुन्ह्याचे तपासासाठी उत्तम टिमवर्क, तांत्रीक विश्लेषण व एआय तंत्रज्ञानाचा वापर करून आंतरराज्य पोलीसांसोबत समन्वय ठेवुन, सातत्यपुर्ण प्रयत्नांनी गुन्हा उघडकीस आणण्यात आलेला आहे. गुन्ह्यातील सर्व आरोपी हे सराईत व रेकॉर्डवरील गुन्हेगार आहेत. अटक आरोपी यांचे शोधकामी बाहेरराज्यातील विशेषत: बदायु, उत्तर प्रदेश येथील SWAT पथकातील हेड कॉन्स्टेबल सचिन झा, सहारनपुर, उत्तर प्रदेश येथील एस.आय. निरज पवार, पोहवा. हरेंद्र, अमीत चिकारा, जोगेंद्र व पोअं. विवेक राणा यांचे विशेष सहकार्य लाभले. अटक आरोपींचे ताब्यातुन गुन्ह्यात वापरलेले वाहन फॉर्च्युनर कार क्र. एम.एच ४९ बि. ९१९२ हे जप्त करण्यात आलेले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा. श्री. दीपक अग्रवाल पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, मपोनि. श्रीमती शुभांगी देशमुख, सपोनि. चेतन बोरखेडे, नितीन चुलपार, राजाराम जाधव, पोउपनि. विवेक झिंगरे, पोहवा. अर्जुन यादव, कमलेश गणेर, मनोज टेकाम, प्रितम यादव, रितेश तुमडाम, योगेश वासनिक, महेंद्र सडमाके, नितीन वासनिक, चंद्रशेखर राघोर्ते, अनंता क्षिरसागर, पराग ढोक, रोशन तिवारी, नितीन वर्मा, कमलेश गहलोद, पोअं. संदीप पांडे, सुधिर पवार, कुणाल गेडाम, धिरज पंचभावे, मिथुन नाईक, चैतन्य, परमेश्वर, आशिष धंदरे व अझमत शेख यांनी केली.